① F.Y.B.A

Paper / Subject Code: 96016 / Marathi (Compulsory)

QP Code : 33903

[३ तास] [एकूण गुण : १००

सूचना :– १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

प्र. १अ) 'दुस–या वेळी पास झालो' या लेखात महात्मा गांधी यांच्या शालेय जीवनातील कोणकोणत्या आठवणी आल्या आहेत? सविस्तर लिहा. २०

किंवा

आ) 'कोठे होतो कोठे आलो' या लेखात सुशीलकुमार शिंदे यांनी सांगितलेल्या त्यांच्या संघर्षमय जीवनाची वाटचाल तुमच्या शब्दात विशद करा. २०

प्र.२अ) 'वाटेवरच्या सावल्या' या लेखाच्या आधारे प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कुसुमाग्रज एक यशस्वी साहित्यिक कसे बनले? ते स्पष्ट करा. २०

किंवा

आ) 'प्रारंभ' या लेखात अभिव्यक्त झालेले यशवंतराव गडाख यांचे शालेय व कौटुंबिक जीवन शब्दांकित करा? २०

प्र. ३) टिपा लिहा. (कोणत्याही दोन) १०

अ) ना. सी. फडके यांचे वडील

आ) सी. रामचंद्र यांचे शालेय जीवन

इ) चंद्रशेखर धर्माधिकारी यांची वक्तृत्व शैली

ई) शांता शेळके यांच्या बालपणीच्या आठवणी

प्र. ४अ) ठाणे जिल्हा बँकेची कल्याण शहरात नवीन शाखा सुरू करण्यासाठी योग्य जागेचा शोध घेण्यासाठी बँकेच्या संचालक मंडळाकडून तीन सदस्यांची समिती नेमण्यात आली. या समितीचे प्रमुख या नात्याने बँकेचा नवीन शाखेकरीता योग्य जागा शोधल्याचे अहवालात्मक इतिवृत्त तयार करा. १०

किंवा

आ) कोकण पूरग्रस्त निधी जमविण्याबाबत 'वाशी रोटरी क्लबने' बोलाविलेल्या सर्व सदस्यांच्या विशेष सभेचे इतिवृत्त तयार करा. १०

प्र. ५अ) 'भारत शेती उद्योग महामंडळ, अलिबाग'तर्फे शेतक–यांकरीता विहिरीतून पाणी उपसण्यासाठी 'किसान मित्र' नावाचा पंप बाजारात नव्याने दाखल होत आहे. त्याची वर्तमानपत्रासाठी जाहिरात तयार करा. १०



BB31284A8831F563D01BDD7737591E11

किंवा

आ) तुमच्या गावात / शहरात नव्याने सुरू होत असलेल्या एका कापड दुकानाची जाहिरात वर्तमानपत्रासाठी तयार करा. १०

प्र. ६) पुढील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. १०

मराठी भाषा मरणोन्मुख झालेली आहे. असे कुणीच म्हणणार नाही. तिची प्रकृती कदाचित राहावी तितकी बरोबर राहात नसेल. शास्त्रीय वाङ्मयाचा व्यायाम घेण्याचा तिला कंटाळा आहे. प्रेमाची खमंग फोडणी दिलेले पदार्थच तिला फार आवडतात. तिची वेशभूषा अगदी आजच्या घटकेला शोभणारी असली, तरी मन मात्र अजून मागच्या काळात रेंगाळत आहे, इत्यादी आक्षेपांत थोडासा तथ्यांश असला तरी तिच्या या तक्रारी काही कायम टिकणा-या नाहीत. ज्यांचे आसन सरस्वतीमंदिरात स्थिर झाले आहे. अशा लोकप्रिय ललित लेखकांनी आपल्या आवडीच्या शास्त्राविषयी वाङ्मय निर्माण करण्याचे ठरविले तर ते काय त्यांना अशक्य आहे? 'गरज तसा पुरवठा' हे तत्त्व मला वाङ्मयातही मान्य आहे; एण ते पाळताना लेखकाने व्यापारी होऊ नये. डॉक्टर व्हावे. रोग्याच्या शरीराला ज्या ज्या द्रव्याची जरुरी असते ती ती औषधाच्या द्वारे त्याला देणे हेच डॉक्टरांचे कर्तव्य नव्हे का? शिवाय गरज तसा पुरवठा या तत्त्वाइतकेच 'गरज ही कल्पकतेची आई' हे तत्त्वही प्रसिद्ध आहे. म्हणजे पुरवठा व कल्पकता यांचे बहीण-भावंडाचे नाते होते. हे नाते पाळण्याची दक्षता लेखकांनी घ्यायला नको का?

प्र. १) मराठी भाषेविषयी कोणते आक्षेप घेतले जातात?

प्र. २) कोणत्या दोन तत्त्वांचा उल्लेख उता-यात केला आहे?

प्र. ३) ललित लेखकांकडून कोणती अपेक्षा व्यक्त केली आहे?

प्र. ४) ललित लेखकांनी कोणती दक्षता घ्यावी?

प्र. ५) उता-यास समर्पक शीर्षक सूचवा.

किंवा

आ) पुढील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. १०

मनुष्याच्या उद्योगाचे किंवा प्रवृत्तिप्रणित मानसिक व शारीरिक चलनावस्थेचे दोन भेद आहेत. एक नियामक व दुसरा उत्पादक. नियामक उद्योग म्हणजे ज्या उद्योगामुळे मनुष्यास आपल्या समाजात व्यवस्था ठेवता येते. राजे, मंत्री, लष्करी शिपाई, न्यायाधीश, पोलीस, सामान्य नीतिशिक्षक वगैरे लोकांचा उद्योग पहिल्या प्रकारचा आहे. म्हणजे हे समाजयंत्राचे फक्त चालक किंवा व्यवस्थापक आहेत. शेतकरी, कोष्टी, सुतार, गवंडी वगैरे सर्व प्रकारचे कारागीर व धंदेवाले लोक दुस-या वर्गात येतात. म्हणजे त्यांचा उद्योग उत्पादक आहे. सुधारलेल्या राष्ट्रांतील काही लोक पाहिल्या प्रकारचा व काही दोन्ही प्रकारचे उद्योग करीत असतात. देशाच्या विशिष्ट स्थितीप्रमाणे या निरनिराळ्या वर्गातील लोकांचे प्रमाण

कमी–अधिक होत असते. केवळ नियामक उद्योग करणा–यांची संख्या अगदीच स्वल्प, थोडासा नियामक व पुष्कळसा उत्पादक उद्योग करणा–यांची मोठी संख्या ज्या देशात असते, तो विशेष सुखी असतो. ज्या लोकांस उत्पादक उद्योगाचा कंटाळा व काही हौस असली तर नियामक उद्योगाची–असे लोक मोठेपणास कधीही चढणार नाहीत. पण सध्या तरी आमची तशी स्थिती होऊन गेली आहे. ज्याला त्याला अंमलदार व्हावयाला पाहिजे. सगळ्यांनीच अंमलदार होऊन चैन करण्याची इच्छा धरल्यास चैनीचे पदार्थ तरी उत्पन्न कोण करणार? उत्पादक उद्योग करण्याची हौस सार्वत्रिक होऊन संपत्ती व व्यापार वाढविल्याशिवाय सर्वांस चैन तरी कोठून करता येणार? अंमलदार मुळीच नकोत असे आमचे म्हणणे नाही; पण शेरभर मसाला आणि मूठभर तांदूळ अशी स्थिती काय कामाची?

प्र. १) मनुष्याच्या उद्योगाचे प्रकार किती व कोणते?

प्र. २) नियामक उद्योगाचा अर्थ सांगून या उद्योगात कोणत्या लोकांचा समावेश होतो?

प्र. ३) उत्पादक उद्योगात कोणत्या लोकांचा समावेश होतो?

प्र. ४) कोणत्या प्रकारचा देश आपली उन्नती करतो?

प्र. ५) उता–यास समर्पक शीर्षक सूचवा.

प्र. ७अ) पुढील उता–याचे सारांशलेखन करा. १०

१८६० पर्यंत जपान हा देश भेदजर्जर व दुर्बल असा होता. अमेरिकेने लष्करी जहाजे पाठवून, तोफा रोखून जपानी लोकांकडून आपल्याला हव्या त्या तहावर सह्या करून घेतल्या; पण ही गोष्ट घडताच तेथील सरंजामदाराची विवेकबुद्धी जागृत झाली. सत्सुना, चोशियु, टोसा व हिझेन हे चार प्रमुख सरंजामदार त्यावेळी जपानमध्ये होते. ''जपान एकछत्री होऊन बलिष्ठ झाला पाहिजे'' असे त्यांनी ठरविले व स्वतःचे सरंजाम खुषीने खाली करून सम्राटाच्या स्वाधीन केले. धनाचे व लष्काराचे सर्व सामर्थ्य त्यावेळी या चार घराण्याच्या अधीन होते. तरी त्यांची विवेकबुद्धी, ऐक्य साधलेच पाहिजे ही बुद्धी प्रबळ ठरली; आणि म्हणून जपान संघटित व प्रबळ झाला. तेथे सामुराई हे रजपुतांच्यासारखे श्रेष्ठवंशीय लढवय्ये लोक होते; आणि येटा व हिनीन या आपल्याकडच्या अस्पृश्यांसारख्या जाती होत्या. आपल्याकडे ब्राह्मण–क्षत्रियांच्या रस्त्याने अस्पृश्यांना जाण्यास बंदी होती; अस्पृश्यांची सावली उच्चवर्णीय घेत नसत. तेथे एवढ्यावरच भागत नसे. हिनीन माणूस सामुराईच्या नुसता जवळून गेला तर पुष्कळ वेळा सामुराई त्याची कत्तल करत असे. इतके तीव्र भेद असताना सम्राटाच्या एका आज्ञापत्राने उच्चवर्णीय जपानी लोकांना ते पंचवीस–तीस वर्षाच्या आत पुष्कळ प्रमाणात नाहीसे करून टाकले. याचा अर्थ असा की, अनंत प्रकारची भेदकारणे प्रत्येक समाजाच्या राशीला लागलेली असतात; पण त्यांच्या आहारी जावयाचे नाही, असा दृढ निश्चय करून त्याच्यावर आपल्या विवेकबुद्धीने मात करण्याची जो समाज सिद्धता करतो त्याला ही कारणे विघटित करू शकत नाहीत. उलट ही विवेकशक्ती ज्याने संवर्धित केली नाही तो समाज कोणत्याही क्षुल्लक भेदकारणाला बळी पडून छिन्नभिन्न होऊन शेवटी रसातळाला जातो.



BB31284A8831F563D01BDD7737591E11

किंवा

आ) पुढील उता–याचे सारांशलेखन करा. १०

लोकशाहीमध्ये व्यक्तीला फार महत्त्व आहे. प्रत्येक व्यक्तीने शिक्षित बनून आपल्या जीवनात आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्ये व वृत्ती मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक व्यक्ती साक्षर तर झालीच पाहिजे; परंतु आपल्या देशबांधवांना साक्षर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. लोकशाही ही लोकांनी आपल्या लोकप्रतिनिधींमार्फत लोकांच्या कल्याणाकरिता चालविलेली राज्यपद्धती असल्यामुळे विविध स्तरांवरील शासनयंत्रणा, त्यांची उद्दिष्टे व कार्यपद्धती समजावून घेऊन प्रत्येक नागरिकाने आपल्या परीने सहकार्य केले तरच तो तिच्यासमोरील उद्दिष्टे साध्य करू शकेल; म्हणून लोकशाहीतील नागरिक साक्षर व सतत ज्ञान प्राप्त करून घेणारा असला पाहिजे. सर्व व्यक्ती माणूस म्हणून समान दर्जाच्या असतात. मग कोणी मोठ्या अधिकाराच्या जागेवर असो किंवा कोणी कनिष्ठ जागेवर काम करीत असो. ही श्रद्धा लोकशाहीतील नागरिकांच्या मनात रुजणे आवश्यक आहे. लोकशाहीतील नागरिकाने धर्म, जात, लिंग, भाषा इत्यादींमुळे उच्च–नीचता निर्माण होते, असे मानता कामा नये.

प्र. ८) पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. १०

१) ग्रंथ : एक कल्पवृक्ष

२) मराठी असे आमुची मायबोली

३) लोकशाहीतील निवडणुका

४) आजची जागृत स्त्री

५) वृत्तपत्रांची सामाजिक बांधिलकी

०.०.०



BB31284A8831F563D01BDD7737591E11